International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

Original Article

राहुल सांकृत्यायन यांच्या तिबेट यात्रा : भारतीय बौद्ध इतिहासलेखनातील एक ऐतिहासिक टप्पा

डॉ. प्रविण बोरकर

सहयोगी प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग, आर. के. तलरेजा कॉलेज, उल्हासनगर.

Manuscript ID:
IJAAR-140131

ISSN: 2347-7075
Impact Factor – 8.26

Volume – 14
Issue – 1
September- October 2026
Pp. 243 - 251

Submitted: 04 Oct 2026
Revised: 15 Oct 2026
Accepted: 20 Oct 2026
Published: 25 Oct 2026

Corresponding Author:
डॉ. प्रविण बोरकर

Quick Response Code:

Website: https://ijaar.co.in/

DOI:
10.5281/zenodo.23656643

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.23656643

Creative Commons

OPEN ACCESS

सारांश:

भारतीय बौद्ध इतिहास लेखन (बौद्ध धम्माच्या अनुषंगाने झालेले इतिहास लेखन) हा भारतीय इतिहास लेखनातील एक महत्त्वाचा भाग असून याद्वारे प्राचीन भारताच्या इतिहासावर प्रकाश पडतो. बौद्ध इतिहासलेखन हे प्रामुख्याने प्रारंभीच्या काळात पाली भाषेत झाले परंतु नंतरच्या काळात संस्कृत भाषेत बौद्ध धम्मावर ग्रंथ लिहिण्यात आले, त्यातही तत्त्वज्ञानपर ग्रंथांची निर्मिती अधिक प्रमाणात झाली, यातील ग्रंथकारांमध्ये अश्वघोष, नागार्जुन, असंग, वसुबंधू, दिग्नाग, शांतरक्षित, धम्मकीर्ती, प्रज्ञाकरगुप्त, ज्ञानश्रीमित्र, रत्नकीर्ती इत्यादी विद्वानांचा समावेश होतो. संस्कृत भाषेतील ग्रंथ प्रामुख्याने महायान पंथाचा प्रचार प्रसार करण्यासाठीची आणि वैचारिक मांडणीची प्रमुख माध्यमे होती. बौद्ध तत्त्वज्ञानाचा विकास या काळात घडून आला आणि बौद्ध तत्त्वज्ञानाने वैदिक तत्त्वज्ञानापुढे एक मोठे आव्हान उभे केले, परंतु मध्यकाळात मुस्लिम आक्रमणामुळे आणि अंतर्गत विरोधामुळे बौद्ध विद्यापीठे आणि मठांची नासधूस झाल्याने संस्कृत बौद्ध ग्रंथ भारतातून लुप्त झालेत. बौद्ध भिक्खूंनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी आणि अनमोल अशा ग्रंथांच्या सुरक्षिततेसाठी नेपाळ, तिबेट अशा उंच आणि दुर्गम प्रदेशाचा आश्रय घेतला. यामुळे भारतीय बौद्ध तत्त्वज्ञानावरील महत्त्वपूर्ण ग्रंथाची उणीव भारतात निर्माण झाली, यास्तव आधुनिक काळात धम्मकीर्ती, प्रज्ञाकरगुप्त, रत्नकीर्ती आणि ज्ञानश्रीमित्र यांच्या संस्कृत ग्रंथांचा तिबेटमध्ये शोध घेऊन त्यांची पुनर्रचना करण्याचे काम राहुल सांकृत्यायन यांनी केले. राहुल यांचे हे काम अजिबात सोपे नव्हते तर ते अत्यंत जोखमीचे आणि धोकादायक होते, असे असले तरी राहुल यांनी तिबेटच्या चार यात्रा करून संस्कृत भाषेतील अनमोल अशी ग्रंथसंपदा पुन्हा मिळवली, त्यामुळे राहुल यांच्या तिबेटच्या या यात्रा म्हणजे भारतीय बौद्ध इतिहासलेखनातील महत्त्वाचा टप्पा होय असे म्हणणे संयुक्तिक ठरते.

प्रमुख्य शब्द : राहुल सांकृत्यायन, बौद्ध इतिहासलेखन, तिबेटच्या यात्रा, संस्कृत हस्तलिखिते, धम्मकीर्ती, ज्ञानमीमांसा, महायान तत्त्वज्ञान.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0), *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

How to cite this article:
डॉ. प्रविण बोरकर (2026). राहुल सांकृत्यायन यांच्या तिबेट यात्रा : भारतीय बौद्ध इतिहासलेखनातील एक ऐतिहासिक टप्पा. International Journal of Advance and Applied Research, 14(1), 243 – 251. https://doi.org/10.5281/zenodo.23656643

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

प्रस्तावना:

आधुनिक भारतातील एक महत्त्वाचे लेखक, विद्वान व यात्री म्हणून राहुल सांकृत्यायन यांची ओळख आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व विविधांगी स्वरूपाचे होते, त्यांनी जगभर केलेली भ्रमंती, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचा सहभाग, त्यांनी घेतलेली बौद्ध धर्माची दीक्षा, त्यांचे भारतशास्त्रीय संशोधन, त्यांनी केलेले विपुल लेखन आणि त्यांचा मार्क्सवादी दृष्टीकोन हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाच्या बाबी होत. ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या मुळच्या 'केदारनाथ पांडे' (बौद्ध धर्माच्या दिक्षेनंतरचे राहुल सांकृत्यायन) यांचा वैष्णव साधू, आर्यसमाजी, बौद्ध भिक्खू व शेवटी मार्क्सवादी असा चढता क्रम आहे. पारंपारिक संस्कृत शिक्षणापासून सुरु झालेला त्यांचा प्रवास बौद्ध तत्त्वज्ञानाच्या सखोल अभ्यासापर्यंत पोहोचतो, याच तत्त्वज्ञानाच्या प्रभावातूनच ते बौद्ध धर्माकडे आकर्षित होतात, मार्क्सवादाच्या प्रभावाने पुढे ते मार्क्सवादी विचारांचा स्वीकार करतात. राहुल यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे १९२९ ते १९३८ या दरम्यान केलेल्या तिबेटमधील चार महत्त्वाच्या, जोखीमेच्या प्रेरणादायी यात्रा होत. तिबेटच्या बंदिस्त सीमांमुळे अनेक धोके पत्करून केलेल्या या प्रवासादरम्यान त्यांनी शेकडो लुप्त झालेल्या संस्कृत ताडपत्र हस्तलिखितांचा शोध घेतला, यातील काहींची त्यांनी छायाचित्रे काढली तर काही अथक परिश्रमाने हाताने लिहून काढले.

१२ व्या शतकात नालंदा आणि विक्रमशिला यांसारख्या मठ विद्यापीठांची जेव्हा नासधूस झाली तेव्हा सुरक्षितेच्या दृष्टीने ही हस्तलिखिते बौद्ध भिक्खूंनी भारताबाहेर नेपाळ व विशेषतः तिबेटमध्ये नेली, त्यामुळे ही हस्तलिखिते नष्ट होण्यापासून वाचली. राहुलजी यांनी या ग्रंथांची पुनर्रचना करून, विशेषतः बौद्ध ज्ञानमीमांसा शाखेच्या पायाभूत ग्रंथांची उदा. धर्मकीर्तीचे 'प्रमाणवार्तिक' आणि प्रज्ञाकरगुप्तांचे 'प्रमाणवार्तिकभाष्य' भारतीय बौद्ध तर्कशास्त्र आणि ज्ञानमीमांसेचा लुप्त झालेला वारसा पुनरुज्जीवित केला आणि भारतीय बौद्धिक इतिहासाचा एक संपूर्ण अध्याय नव्याने रचला. हा शोधनिबंध राहुल सांकृत्यायन यांच्या जीवनप्रवासाचे, हस्तलिखितांच्या स्थलांतराच्या ऐतिहासिक संदर्भाचे, त्यांच्या तिबेटमधील चार मोहिमांच्या तपशिलांचे, त्यांच्या प्राथमिक शोधांच्या माहितीचे समीक्षात्मक विश्लेषण करतो.

राहुल यांचा अल्पपरिचय :

आधुनिक भारताचा बौद्धिक इतिहास अनेक शोधांनी भरलेला आहे, परंतु बौद्ध तर्कशास्त्र आणि ज्ञानमीमांसेच्या लुप्त झालेल्या संस्कृत ग्रंथांचा दूरगामी परिणाम करणारा शोध दुर्मिळ आहे. या अभूतपूर्व कामगिरीच्या केंद्रस्थानी असलेली महनीय व्यक्ती म्हणजे महापंडित राहुल सांकृत्यायन (१८९३-१९६३) होत. राहुल यांचे जीवन हे भटकंती आणि विद्वत्तेचा एक अपूर्व संगम होता, त्यांनी पारंपारिक शैक्षणिक सीमा आणि शारीरिक अडचणींना आव्हान दिले. राहुल हे प्रवास साहित्यातील आधुनिक प्रवर्तक, १२ हून अधिक भाषांवर प्रभुत्व मिळवणारे बहुभाषाविद, समाजसुधारक, राजकीय कार्यकर्ते आणि बौद्ध तत्त्वज्ञान तसेच मार्क्सवादी भौतिकवादाचे गाढे अभ्यासक होते.

राहुल यांच्या बौद्धिक प्रवासाचे विशेष म्हणजे सततचे परिवर्तन होय. उत्तर प्रदेशातील जिल्हा

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

आझमगढ' येथील 'पंदहा' नावाच्या गावी एका पारंपारिक ब्राह्मण धार्मिक कुटुंबात 'केदारनाथ पांडे' म्हणून जन्मलेले [१] सांकृत्यायन ज्ञानाच्या शोधात लहान वयातच घरातून पळून गेले आणि वैष्णव साधू बनून 'रामउदारदास' या नावाने भारतभर फिरले.[२] या शोधाने त्यांना शेवटी आर्य समाजाच्या सुधारणावादी शिकवणीकडे नेले, जिथे त्यांनी वादविवाद आणि धार्मिक चर्चांमध्ये भाग घेतला. परंतु वैदिक धर्मवादाने असमाधानी असलेल्या त्यांच्या बुद्धीने बौद्ध धर्माच्या समृद्ध, बुद्धिवादी परंपरांकडे मोर्चा वळवला. १९२७ मध्ये ते संस्कृतचे शिक्षक म्हणून श्रीलंकेला गेले,[३] अध्यापना सोबत पाली बौद्ध ग्रंथांचा अभ्यासही त्यांनी केला व श्रीलंकेतच शेवटी त्यांनी बौद्ध भिक्खू म्हणून दीक्षा घेतली आणि त्यांना 'राहुल' हे नाव मिळाले, [४] ज्यामध्ये त्यांनी 'सांकृत्यायन' (प्राचीन ऋषी सांकृत्य यांच्या वंशाचे प्रतीक) ही उपाधी जोडली. त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांना 'महापंडित' आणि 'त्रिपिटकाचार्य' (बौद्ध धर्माच्या तीन पिटकांवर प्रभुत्व मिळवणारे) या पदव्या मिळाल्या. नंतरच्या आयुष्यात, सोव्हिएत युनियनच्या भेटीनंतर, सांकृत्यायन यांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला आणि बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाचा द्वंद्वात्मक भौतिकवादाशी मेळ घालण्याचा प्रयत्न केला. या सर्व परिवर्तनांदरम्यान, भारताचा गमावलेला बौद्धिक वारसा परत मिळवण्याची त्यांची बांधिलकी अढळ राहिल्याने त्यांनी तिबेटमधील मठांमध्ये असलेल्या संस्कृत बौद्ध साहित्याचा शोध घेण्याचा यशस्वी ऐतिहासिक प्रयत्न केला.

तिबेटमधील बौद्ध साहित्याच्या शोधाची पार्श्वभूमी:

राहुल सांकृत्यायन यांच्या तिबेट प्रवासाचे ऐतिहासिक महत्त्व पूर्णपणे समजून घेण्यासाठी, मध्ययुगीन भारतातील बौद्ध धर्माच्या लोपाचा आढावा घेतला पाहिजे. पाचव्या ते बाराव्या शतकापर्यंत, उत्तर भारत हा आशियाचा बौद्धिक गाभा होता, त्याला नालंदा, विक्रमशिला, उदंतपुरी यांसारख्या भव्य मठ विद्यापीठांचे (महाविहार) पाठबळ होते. या संस्था केवळ धार्मिक केंद्रे नव्हती, तर विज्ञान, औषध, व्याकरण, गणित आणि तत्त्वज्ञानाच्या प्रगत अकादमी होत्या. सर्वात महत्त्वाच्या घडामोडी 'प्रमाण' (ज्ञानमीमांसा आणि तर्कशास्त्र) क्षेत्रात घडल्या, ज्याचे नेतृत्व 'दिङ्नाग', 'धर्मकीर्ती', 'शांतरक्षित' आणि 'ज्ञानश्रीमित्र' यांसारख्या महान आचार्यांनी केले.

मात्र हा सुवर्णकाळ बाराव्या शतकाच्या शेवटी आणि तेराव्या शतकाच्या सुरुवातीला बख्तियार खिलजी आणि त्याच्या सैन्याच्या नेतृत्वाखालील बिहार आणि बंगालवरील आक्रमणांमुळे संपला. मठ विद्यापीठे लुटली गेली, त्यांची भव्य ग्रंथालये पेटवून दिली गेली, आणि हजारो भिक्षूंची कत्तल करण्यात आली. या अस्तित्वाच्या संकटाच्या काळात बौद्ध भिक्खू आणि विद्वानांनी उत्तर भारतातून पळ काढला,[५] त्यांनी नेपाळ, भूतान, आसाम आणि तिबेटच्या उंच पठाराच्या शेजारील प्रदेशात आश्रय घेतला. आपल्या जीवाचा बचाव करत असतांना भिक्खूंनी मौल्यवान हस्तलिखिते, ग्रंथसंपदा सुद्धा सोबत नेली, या ग्रंथसंपदेचे तिबेटी विद्वानांनी स्वागत केले. या ग्रंथ व हस्तलिखितांच्या संस्कृत मूळ प्रती साक्या, शलू आणि नारथंग यांसारख्या मोठ्या तिबेटी मठांमध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

पुढील काळात जेव्हा बौद्ध धर्माचा भारतात लोप झाला तेव्हा संस्कृत मूळ प्रतींच्या नाशासह, शतकानुशतके भारतीय बौद्धिक जीवन परिभाषित करणारे समृद्ध तत्त्वज्ञानात्मक वादविवाद भारतीय विद्वानांसाठी राहिले नाही. या कृतींची तिबेटी भाषांतरे 'कंजूर' आणि 'तंजूर' संग्रहात जतन केली गेली असली तरी, संस्कृत मूळ प्रती कायमच्या नष्ट झाल्याचे गृहीत धरले गेले. आधुनिक काळात भारतीय तत्त्वज्ञानाची पुनर्रचना मुख्यत्वे ब्राह्मणवादी दृष्टिकोनातून केली गेली, ज्यामुळे बौद्ध तर्कशास्त्र आणि ज्ञानमीमांसेच्या आकलनात एक मोठी दरी निर्माण झाली. रशियन प्राध्यापक फ्योदोर शेर्बात्स्की आणि इतर युरोपीय भारतशास्त्रज्ञांनी या नुकसानाबद्दल खेद व्यक्त केला त्यामुळे धर्मकीर्तींच्या ग्रंथांच्या संस्कृत मूळ प्रतींशिवाय भारतीय तर्कशास्त्राची पुनर्रचना करणे अशक्य आहे हे अधोरेखित झाले. हीच ऐतिहासिक पोकळी राहुल सांकृत्यायन यांनी भरून काढण्याचे ठरवले, त्यासाठी त्यांनी तिबेटच्या चार यात्रा केल्यात.

तिबेटला जाण्याची प्रेरणा:

राहुल हे श्रीलंकेतील विद्यालंकार विहारात संस्कृतचे शिक्षक म्हणून कार्यरत असतांना त्यांचा पाली भाषा व साहित्याशी जवळचा संबंध आला, त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये आमूलाग्र बदल झाला, त्यांनी बौद्धिक उंचीचा पुढील टप्पा गाठला. श्रीलंकेतील वास्तव्यातच बौद्ध तत्त्वज्ञानाच्या विस्तृत अभ्यासासाठी त्यांच्या मनात तिबेटला जाण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली होती. शिवाय बरेचसे संस्कृत बौद्ध ग्रंथ भारतातून लुप्त झाले होते त्यांचाही शोध त्यांना घ्यायचा होता. त्यांच्याच शब्दात, "तोपर्यंत मी हे निश्चित केले होते की, लंकेतून तिबेटला जाणे गरजेचे आहे; कारण तिथे गेल्याशिवाय, बौद्ध तत्त्वज्ञान आणि भारतातील बौद्ध धर्माचा इतिहास समजून घेण्याचा माझा शोध पूर्ण होऊ शकत नाही."[६] यास्तव राहुल तिबेटला जाण्याच्या प्रबळ इच्छेने भारतात परतले.

तिबेटची पहिली यात्रा (१९२९):

राहुल यांची पहिली मोहीम ही सर्वांत जोखिमेची होती, कारण तिबेटी अधिकारी आणि ब्रिटिश सरकार या दोघांकडून इंग्रजी राजवटीतील भारतीय लोकांना तिबेटमध्ये प्रवेश करण्यास सक्त मनाई होती. त्यामुळे शिवरात्रीच्या यात्रेला जाण्याच्या बहाण्याने राहुलजी नेपाळला गेले [७] आणि काठमांडूहून ते तिबेटी लामांच्या गटात सामील झाले, लामांच्या गटातील एक सदस्य होऊनच ते नेपाळच्या सीमेपर्यंत गेले.[८] सीमेवर चौकशीसाठी थांबविले असता आपले नाव 'छेवंग' आणि आपली ओळख के-रोंगच्या अवतारी लामाचे शिष्य अशी सांगितल्याने ते नेपाळची सीमा पार करून तिबेटच्या सीमेत दाखल झाले.[९] १९ जुलै १९२९ रोजी, अनेक महिन्यांच्या खडतर प्रवासानंतर सांकृत्यायन शेवटी ल्हासा येथे पोहोचले. पैशाची कमतरता आणि शारीरिक थकवा असूनही, त्यांनी तिबेटी भाषेचा अभ्यास आणि हस्तलिखितांचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यांनी स्थानिक व्यापारी, मठातील विद्वान यांच्याशी संपर्क केला शिवाय तिबेटमधील सर्वोच्च धर्मगुरू दलाई लामा लामांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला.[१०] तीन वर्षे तिबेटमध्ये राहून बौद्ध ग्रंथांचे अभ्यासपूर्ण संशोधन करावे असा विचार राहुल यांनी प्रारंभी केला पण त्यांच्या संशोधनकार्यात पैशांची मोठी अडचण असल्याने आचार्य नरेंद्र देव व भदंत आनंद कौसल्यायन यांनी त्यांना आर्थिक

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

मदत केली. [११] या मदतीमुळे त्यांचा मार्ग सुकर झाला होता; परंतु तीन वर्षांपर्यंत संशोधन करण्याचा त्यांचा संकल्प मात्र पूर्ण होऊ शकला नाही.

एका वर्षापेक्षा जास्त काळाच्या या मुक्कामात राहुल यांनी १,६१९ तिबेटी हस्तलिखिते आणि ब्लॉकप्रिंट्सचा अफाट खजिना गोळा केला, ज्यामध्ये कंजूर आणि तंजूरच्या (कंजूर व तंजूर हे तिबेटी बौद्ध ग्रंथ आहेत. कंजूर हा ग्रंथसंग्रह प्रामुख्याने बुद्धवचनांशी संबंधित असून तंजूरमध्ये विविध प्रकारच्या २२५ भाषांतरित ग्रंथांचा समावेश आहे.) दुर्मिळ आवृत्त्या, तसेच डझनभर मौल्यवान थंका चित्रे आणि कलावस्तूंचा समावेश होता. १९३० मध्ये जेव्हा ते तिबेटमधून कलिंपोंगमार्गे भारतात परतले, तेव्हा त्यांचा संग्रह इतका मोठा होता की, तो आणण्यासाठी १८ सतरा-अठरा खेचरांवर लादून तो आणावा लागला. या संग्रहातील काही ग्रंथ व चित्रे त्यांनी 'पटना म्युझियम'ला भेट दिली. तर काही ग्रंथसंपदा 'बिहार-ओरिसा रिसर्च सोसायटी'ला दिली. [१२] यामुळे भारतातील आधुनिक 'तिबेटी अभ्यासाचा' पाया रचला गेला.

तिबेटची दुसरी यात्रा (१९३४):

१९३४ मध्ये राहुल दुसऱ्यांदा तिबेटला गेले.[१३] पहिल्या यात्रेच्या वेळी त्यांचे संस्कृत ग्रंथांच्या शोधाचे काम अपूर्ण राहिले होते, ते त्यांना पूर्ण करायचे होते. यावेळी ते केवळ तिबेटी भाषांतरांऐवजी मूळ संस्कृत ताडपत्र हस्तलिखितांचा शोध घेण्याच्या स्पष्ट उद्देशाने तिबेटला आले होते. या काळात त्यांनी तिबेटी भाषेवर प्रभुत्त्व मिळवले होते. या मोहिमेदरम्यान त्यांनी शलू आणि साक्या मठांना भेट दिली, या मठांमध्ये १२ व्या शतकात भारतातून आणलेली अनेक मूळ संस्कृत हस्तलिखिते अद्याप बंद ग्रंथालयांमध्ये जतन केलेली आहेत हे त्यांना समजले. तिबेटमधील विविध बौद्धविहार आणि मठांमध्ये जाऊन संस्कृत ग्रंथांचा शोध घेत असताना ल्हासाजवळील 'कुंदे-लिंग' विहारात त्यांना धर्मकिर्तीच्या 'वादन्याय'वर शांतरक्षितच्या टीकेची एक अनमोल पोथी मिळाली.[१४] तर 'साक्या विहार'मध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण अशी धर्मकिर्तीच्या वादन्यायची मूळ प्रत मिळाली. त्यांच्या मते, "दिग्नाग आणि धर्मकीर्तींसारख्या तर्कशास्त्रज्ञांनी बौद्ध साहित्याला समृद्ध केले होते आणि ते हिंदुस्थानातील महान बुद्धिवादी होते. धर्मकीर्तींचे हे ग्रंथ पाहून मला अत्यंत आनंद झाला." [१५] याचबरोबर त्यांना प्रमाणवार्त्तिक या ग्रंथावर प्रज्ञाकरगुप्त याचे भाष्य 'वार्त्तिकालंकार' सुद्धा मिळाले. [१६] या ग्रंथांचा शोध हे राहुल यांचे अतुलनीय कार्य होते. यानंतर ते भारतात परतले.

तिबेटची तिसरी यात्रा (१९३६):

छायाचित्रण पुनर्रचनेच्या दृष्टीने राहुल यांची ही मोहीम त्यांची सर्वात यशस्वी ठरली. फोल्डिंग कॅमेरा आणि फिल्म व ग्लास निगेटिव्हच्या पुरवठ्यासह सांकृत्यायन यांनी डझनभर दूरवरच्या मठांना भेटी दिल्यात. त्यांचा सर्वात मोठा शोध साक्या मठात झाला. ते ६ मे १९३६ रोजी तिबेटच्या 'साक्या विहारा'त पोहोचले. मागच्या यात्रेदरम्यान त्यांना इथे वर्तिकालंकार हा दुर्लभ ग्रंथ सापडला होता, त्यांच्या लेखनाचे काम अपूर्ण राहिले होते. यावेळी मात्र त्यांनी तिथे राहून लेखनाचे काम पूर्ण केले.[१७] साक्या मठाचे महंत त्यांना सर्व प्रकारची मदत करायला तयार होते. त्यांनी राहुल यांना साक्याजवळीलच 'ल्हाखंग छेनमो' कोठीवरील 'छगपे-ल्हाखंग' हे ग्रंथालय उघडून बघायला सांगितले.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

२५ मे १९३६ हा दिवस राहुल यांच्याकरता संस्मरणीय ठरला कारण याच दिवशी त्यांना त्यांच्या चारही तिबेट यात्रांमध्ये सर्वाधिक ग्रंथराशी 'छगपे-ल्हाखंग' येथे मिळाल्या. त्यांना वर्तिकालंकार, 'कर्णक गोमी'कृत 'स्ववृत्तिटीका', 'असंग'कृत 'योगाचारभूमी', तसेच चांद्रव्याकरणावरील टीका सापडली होती.[१८] बौद्ध तत्त्वज्ञ 'दिग्नाग'चा 'प्रमाणसमुच्चय' हा मूळ संस्कृत ग्रंथ राहुल यांनी तिबेटमध्ये खूप शोधला, परंतु त्यांना यश आले नाही. दिग्नागच्या प्रमाणसमुच्चयावर धम्मकिर्तीने 'प्रमाणवर्तिक' नावाचा स्वतंत्र व्याख्यात्मक ग्रंथ लिहिला होता, तो मात्र त्यांना मिळाला.[१९] (धम्मकीर्तीचा काळ इ. स. सातवे शतक असून त्याच्या प्रमाणवार्तिक ग्रंथाने बौद्ध ज्ञानमीमांसेतील सर्वोच्च शिखर गाठले होते). प्रमाणवार्तिक (मूळ संस्कृत) ग्रंथ सापडल्याबाबत राहुल यांनी डॉ. काशीप्रसाद जयस्वाल व डॉ. फ्योदोर श्चेर्बात्स्की (बौद्ध न्यायशास्त्राचे रशियन विद्वान) यांना पत्राद्वारे माहिती दिली.[२०] डॉ. श्चेर्बात्स्कींना अत्यंत आनंद झाला. त्यांनी भारतात येण्याची इच्छा व्यक्त केली. तसेच त्यांनी काशीप्रसाद जयस्वालांना पत्र लिहून राहुल यांच्या या शोधाबाबत एक आंतरराष्ट्रीय परिषद घेण्याचे सुचविले. या शोधाची बातमी भारतातील वृत्तपत्रांनीही छापली. धर्मकीर्तीला भारतीय (बौद्ध) तत्त्वज्ञानाचा महान उद्धारक मानले जाते, आधुनिक काळात धर्मकीर्तीच्या उद्धाराचे महान कार्य राहुल यांनी केले.[२१]

याच मोहिमेदरम्यान तिबेटमधीलच 'नागोर' विहारात राहुल यांना 'वसुबंधू' या बौद्ध तत्त्वज्ञाने लिहिलेले 'अभिधर्मकोशभाष्य', तर 'सरहपाचा' 'दोहाकोश'ही मिळाला.[२२] तसेच 'तर्करहस्य' व 'वादरहस्य' नावाचे न्यायग्रंथही मिळाले. त्यांची ही तिसरी यात्रा अत्यंत यशस्वी झाली होती. ३० ऑक्टोबर १९३६ रोजी राहुल साक्यावरून भारताकडे निघाले. वृत्तपत्रांत त्यांची खूप प्रसिद्धी झाल्याने त्यांना भेटणाऱ्या लोकांची संख्या वाढली होती. अनेक ठिकाणी त्यांना भाषणे द्यावी लागत होती, सत्कार होत होते. २२ नोव्हेंबर १९३६ रोजी त्यांना टाउनहॉलमध्ये काशीच्या लोकांनी मानपत्र प्रदान केले.[२३]

तिबेटची चवथी यात्रा (१९३८):

राहुलजी यांची तिबेटची शेवटची मोहीम १९३८ मध्ये झाली, या काळात ते भारतात मार्क्सवादी राजकीय सक्रियता आणि शेतकरी संघर्षातही गढून गेले होते. त्यांची राजकीय बांधिलकी असूनही, तिबेटमधील त्यांचे कार्य अपूर्ण असल्याचे त्यांनी ओळखले त्यामुळे पुन्हा त्यांनी तिबेटची वाट धरली. राहुल यांना आता धर्मात आस्था राहिली नसल्याने ते बौद्ध भिक्खूच्या वेशात राहू इच्छित नव्हते, परंतु तिबेटमध्ये बौद्ध भिक्खुंचा सन्मान असल्याने तिथे जाण्यासाठी हा पोशाख त्यांना गरजेचा होता.[२४] तिबेटच्या या चौथ्या यात्रेत त्यांना बरीच मदत मिळाली. बिहार सरकारने त्यांना ६ हजार रुपये दिले, तर तिबेट सरकारने जुन्या ग्रंथालयातील सरकारी मोहर तोडून वस्तू दाखवण्याची परवानगी दिली.[२५] ४ मे १९३८ रोजी राहुल तिबेटला जायला निघाले. २७ मे रोजी ते 'शलू विहारा'त पोहोचले. तेथील ग्रंथालयात त्यांना एक महत्त्वाची पोथी मिळाली. त्यात प्रसिद्ध तत्त्वज्ञ 'ज्ञानश्री'लिखित बौद्ध तत्त्वज्ञानावरचे १२ ग्रंथ होते. योगाचार भूमी या ग्रंथाचे काही भागही त्यांना मिळाले.[२६] या चौथ्या यात्रेत राहुल यांना विशेष असे काही सापडले नाही. परतीच्या प्रवासात मात्र त्यांना डाकूंचा त्रास सहन

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.26 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-14, Issue-1 | September - October 2026

करावा लागला. शेवटी ते कसेतरी आपला जीव आणि ग्रंथ सांभाळत ऑक्टोबर १९३८ मध्ये भारतात परतले.

एकूणच, या चार मोहिमा एका ऐतिहासिक टप्प्याचे प्रतिनिधित्व करतात, ही एक एकहाती बचाव मोहीम होती ज्याने अभिजात भारतीय तत्त्वज्ञानाचा एक मोठा संग्रह विस्मृतीत जाण्यापासून वाचवला.

ज्ञानमीमांसेचा खजिना:

राहुल सांकृत्यायन यांनी हस्तगत केलेल्या साहित्याचे अभ्यासपूर्ण मूल्य अफाट आहे, विशेषतः बौद्ध ज्ञानमीमांसा शाखेच्या (प्रमाणवाद) इतिहासासाठी. त्यांच्या मोहिमांपूर्वी, हे शास्त्र समजून घेण्यासाठी बौद्धिक जग तिबेटी भाषांतरांवर अवलंबून होते. संस्कृत मूळ प्रतींच्या पुनर्रचनेमुळे विद्वानांना या पायाभूत ग्रंथांच्या तंतोतंत शब्दावली, वाक्यरचना आणि तत्त्वज्ञानात्मक बारकाव्यांचा अभ्यास करता आला. बिहार रिसर्च सोसायटीमध्ये जतन केलेल्या या संग्रहात अनेक प्रमुख कृतींचा समावेश आहे ज्यांनी बौद्ध अभ्यासाचे चित्र बदलून टाकले.

आपल्या मोहिमांवरून परत आल्यावर, राहुल सांकृत्यायन यांनी के. पी. जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली पाटणा येथील बिहार रिसर्च सोसायटीकडे थंका चित्रे, हस्तलिखिते आणि छायाचित्र निगेटिव्हचा आपला अफाट संग्रह सोपवला. या संग्रहात दोन प्रमुख भाग आहेत: प्रत्यक्ष तिबेटी हस्तलिखिते (ब्लॉकप्रिंट्स आणि हस्तलिखित ग्रंथ) आणि छायाचित्र निगेटिव्ह. भौतिक हस्तलिखिते, दृश्य थंका चित्रे अभिजात शास्त्रांचे प्रतिनिधित्व करतात, तर निगेटिव्ह गमावलेल्या संस्कृत ग्रंथांच्या प्राथमिक स्रोतांच्या नोंदींचे प्रतिनिधित्व करतात. फेब्रुवारी १९८७ मध्ये, व्हिएन्ना विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट फॉर तिबेटी अँड बुद्धिस्ट स्टडीजचे संशोधक मायकेल टॉर्स्टन मुच यांनी पाटणा म्युझियम परिसरातील बिहार रिसर्च सोसायटीला भेट दिली, ही भेट म्युझियममध्ये संग्रहित असलेल्या निगेटिव्हचे पद्धतशीरपणे कॅटलॉग करण्यासाठी होती. मुच यांच्या मते, राहुलजींनी तिबेटमधून आणलेल्या नेगेटिव्ह्स (छायाचित्रांच्या फिल्म्स) सध्या 'बिहार रिसर्च सोसायटी'च्या ताब्यात आहेत, जी पाटणा संग्रहालयात (पटना म्युझियम) स्थित आहे; तिथे त्या भारतात 'अलमारी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका धातूच्या कपाटाच्या शेल्फवर साठवून ठेवल्या आहेत. अभ्यासाच्या उद्देशाने त्या 'काशी प्रसाद जयस्वाल रिसर्च इन्स्टिट्यूट'कडे हस्तांतरित केल्या जातात, जी संस्था देखील पाटणा संग्रहालयामधील बिहार रिसर्च सोसायटीच्याच खोल्यांमध्ये कार्यरत आहे.[२७]

निष्कर्ष :

राहुल सांकृत्यायन यांच्या तिबेट मोहिमा आधुनिक आशियाई विद्वत्तेतील एका महत्त्वपूर्ण वळणाचे प्रतिनिधित्व करतात. अत्यंत मर्यादित साधनांसह, शारीरिक दुखापत आणि राजकीय अटकेच्या सततच्या धोक्यात काम करत त्यांनी ते साध्य केले जे संपूर्ण पुरातत्त्व विभाग आणि राज्य-पुरस्कृत सर्वेक्षण पथके करण्यात अपयशी ठरली होती. बौद्ध ज्ञानमीमांसा शाखेच्या मूळ संस्कृत हस्तलिखितांच्या त्यांच्या पुनर्रचनेने केवळ भारतीय साहित्याच्या ग्रंथालयात नव्या ग्रंथाची भर घातली नाही; तर आपल्या अभिजात भारतीय तत्त्वज्ञानाच्या आकलनात मूलभूत बदल घडवून आणला.

धर्मकीर्ती, प्रज्ञाकरगुप्त, रत्नकीर्ती आणि ज्ञानश्रीमित्र यांच्या बौद्ध तत्त्वज्ञानपर ऐतिहासिक कृतींची पुनर्रचना करून राहुल यांनी भारताच्या बौद्धिक वारशात एक महत्त्वपूर्ण, गमावलेला टप्पा पुन्हा स्थापित केला. त्यांनी हे सिद्ध केले की अभिजात भारतीय विचार ही कोणतीही एकसंध, स्थिर परंपरा नव्हती, तर कठोर वादविवादाचे एक गतिमान, बहुलवादी क्षेत्र होते, ज्यामध्ये बौद्ध विद्वानांनी तर्कशास्त्र, ज्ञानमीमांसा आणि भाषेच्या तत्त्वज्ञानाच्या सीमा अभूतपूर्व उंचीवर नेल्या. त्यांचे जीवन आणि कार्य हे मानवी उत्सुकता आणि अभ्यासपूर्ण समर्पणाच्या शक्तीला दिलेले एक महान अभिवादन आहे.

संदर्भ :

१. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग १, दुसरी आवृत्ति, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली, २०१०, पृ. ३३-३४
२. कित्ता, पृ. १२०
३. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग २, दुसरी आवृत्ति, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली, २०१०, पृ. १६-१७
४. कित्ता, पृ. ६८
५. आंबेडकर बाबासाहेब, क्रांती आणि प्रतिक्रांती, प्रबुद्ध भारत पुस्तकालय, नागपूर, २०२७, पृ. २३
६. कित्ता, पृ. २३
७. कित्ता, पृ. २६
८. कित्ता, पृ. ३९-४०
९. कित्ता
१०. कित्ता, पृ. ५६-५७
११. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग २, दुसरी आवृत्ति, पृ. ६३ आणि कौसल्यायन भदंत आनंद, जो न भुल सका, तृतीय संस्करण, बुद्धभूमि प्रकाशन, नागपूर, १९९४, पृ. ७७
१२. Jayaswal K. P. The Discoverer, रामशरण शर्मा व् पुष्पमाला जैन (संपा.), राहुल स्मृति, प्रथम संस्करण, पीपुल्स पब्लिशिंग हाऊस, प्रा. लि., नई दिल्ली, १९८८, पृ. ४२३
१३. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग २, दुसरी आवृत्ति, पृ. ११९
१४. Sankrityayan Rahula, Palm-Leaf MSS in Tibet, Journal of the Bihar and Orissa Research Society, Patna, Vol. XXI, Part I, March 1935, p.24
१५. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग २, दुसरी आवृत्ति, पृ. 176
१६. कित्ता, पृ. १७९
१७. Sankrityayan Rahula, Second Search of Sanskrit Palm- Leaf MSS in Tibet [with plats], Journal of the Bihar and Orissa Research Society, Vol. XXIII, Part I, 1937, p. 1-2
१८. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग २, दुसरी आवृत्ति, पृ. २४६
१९. कित्ता, पृ. २४८
२०. कित्ता, पृ. २५२
२१. मुले गुणाकर, महापंडित राहुल सांकृत्यायन (जीवन और कृतित्त्व), पहला संस्करण, नेशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली, १९९३, पृ. ७३

२२. Sankrityayan Rahula, Second Search of Sanskrit Palm- Leaf MSS in Tibet [with plats], Journal of the Bihar and Orissa Research Society, Vol. XXIII, Part I, 1937, p. 18

२३. सांकृत्यायन राहुल, मेरी जीवन-यात्रा भाग २, दुसरी आवृत्ति, पृ. २६१

२४. कित्ता, पृ. २९५

२५. कित्ता, पृ. २९७

२६. Sankrityayan Rahula, Search of Sanskrit MSS in Tibet [with plats], Journal of the Bihar and Orissa Research Society, Vol. XXIV, Part IV, 1938, p. 137-38

२७. Much Michael Torsten, A Visit to Rāhula Sāṅkṛtyāyana's Collection of Negatives at the Bihar Research Society: Texts From the Buddhist Epistemological School, Arbeitskreis für Tibetische und Buddhistische Studien at the University of Vienna, 1988, p. 13-14